# साहित्य अकादमी, साहित्य परिषद पुरस्कार प्राप्त लेखकांचा आज विद्यापीठात सत्कार

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** साहित्य अकादमी, मराठवाडा साहित्य परिषद पुरस्कार प्राप्त लेखकांचा शनिवारी (दि.३) सकाळी ११.३० वाजता विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृह येथे सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते सलिम मुल्ला (जंगल खजिन्याचा शोध), सुशीलकुमार शिंदे (शहर आत्महत्या करायचं म्हणतंय), किरण गुरव (जुगाड), दत्ता घोलप (मराठी कादंबरी : आशय आविष्कार) यांना गौरविण्यात येणार आहे. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. राजन गवस यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

# 'अण्णा भाऊंचे साहित्य चिरंतन'

कोल्हापूर : 'साहित्याच्या सार्वकालिक निकषांवर लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य चिरंतन टिकून राहणारे आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अण्णा भाऊ साठे अध्यासनाच्या वतीने त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या प्रारंभानिमित्ताने 'शाहिरी जागर' या विशेष शाहिरी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये झालेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. पानसरे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी इंग्रजी अधिविभागाचे प्रमुख डॉ. अक्षय सरवदे, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते.

कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी अण्णा भाऊंच्या जन्मशताब्दीनिमित्त विद्यापीठातर्फे विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

### शाहिरांनी गाजविला दिवस

शिवाजी विद्यापीठातला आजचा दिवस खऱ्या अर्थाने शाहिरांनी गाजविला. शाहीर देवानंद माळी (सांगली), शाहीर डॉ. आझाद नायकवडी (कोल्हापूर), शाहीर बाबूराव कांबळे (कांडगाव), शाहीर संजय जाधव (इचलकरंजी), शाहीर सदाशिव निकम (सिद्धनेर्ली) आणि शाहीर नुपूर व राजवैष्णवी वायदंडे यांनी 'शाहिरी जागर' या कार्यक्रमांतर्गत एकाहून एक सरस असे पोवाडे सादर करून वातावरण भारावून टाकले.



शिवाजी विद्यापीठाच्या अण्णा भाऊ साठे अध्यासनातर्फे आयोजित 'शाहिरी जागर' कार्यक्रमात सादरीकरण करताना शाहीर देवानंद माळी व सहकारी.

# विद्यापीठात डिप्लोमा इन ई-बिझनेस अभ्यासक्रमास प्रवेश सुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या एम.बी.ए अधिविभागामध्ये पी.जी.डिप्लोमा इन ई- बिझनेस हा एक वर्ष कालावधीच्या डिप्लोमा कोर्सची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

इच्छुक विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या ॲनेक्स इमारतीमधून अर्ज घेऊन ५ ऑगस्टपर्यंत विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरावयाचे आहेत. पी.जी. डिप्लोमा इन ई-बिझनेस कोर्सला कोणत्याही विषयाचे पदवीधारक विद्यार्थी, नोकरदार वर्ग, व्यावसायिक, गृहिणी प्रवेश घेऊ शकतात. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी एम.बी.ए. अधिविभाग किंवा विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळाला Admission २०१९ या लिंकला भेट द्यावी, असे आवाहन अधिविभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
E 13 AUG 2019
तरुण भारत

# विद्यापीठात बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर जयंती

प्रतिनिधी

कोल्हापूर

बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर जयंती निमित्त बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रामध्ये त्यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच मराठी साहित्यिक पु. ल. देशपांडे, व ग. दि. माडगुळकर यांच्या शताब्दी वर्षा निमित्त, त्यांच्या प्रकाशित साहित्याचे व प्रकाशनाला शंभर वर्ष पूर्ण झालेल्या ग्रंथालयातील पुस्तकांच्या भव्य पुस्तक-प्रदर्शन करण्यात आले.

नवीन प्रवेशीत विद्यार्थांसाठी ग्रंथालयाची सर्व माहीती, नियम, सेवा आदींची माहिति मिळण्यासाठी तयार करण्यात आलेल्या युजर्स



कोल्हापूर : बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर जयंतीनिमित्त पुस्तक प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत अन्य मान्यवर.

गाईड फॉर बीबीकेकेआरसी ब्रोशरचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, ज्ञान स्त्रोत केंद्राच्या संचालक डॉ. एन. बी. खोत, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांच्यासह बॅ. बाळासाहेब खडरेकर ज्ञान स्त्रोत केंद्रामधील सर्व कर्मचारी तसेच ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागातील सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# विद्यापीठामध्ये बॅ. खर्डेकर जयंती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात बॅ. बाळासाहेब खर्डेकर जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रामध्ये त्यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

मराठी साहित्यिक पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगळकर यांच्या शताब्दी वर्ष निमित्ताने त्यांच्या प्रकाशित साहित्याचे व प्रकाशनाला शंभर वर्षे पूर्ण झालेल्या ग्रंथालयातील पुस्तक प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. एन. बी. खोत, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे आदी उपस्थित होते.

3 AUG 2019
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अण्णाभाऊंनी विचारमंथन घडवले

## डॉ. मेघा पानसरे : शिवाजी विद्यापीठात 'शाहिरी जागरा'तून अण्णाभाऊंना अभिवादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

साहित्याच्या सार्वकालिक निकषांवर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य चिरंतन टिकून राहणारे आहे. महाराष्ट्राची शाहिरी परंपरा अण्णाभाऊंनी अधिक संपन्न केली. वाटेगाव ते रशिया व्हाया मुंबई ही त्यांची उत्तुंग भरारी विस्मयकारक होती. परिस्थितीचे भान, संवेदनशीलता हे त्यांच्या साहित्याचे महत्त्वाचे गुणविशेष होते. परिस्थिती आणि शोषितांचे जीवन बदलून टाकण्यासाठी त्यांनी सातत्याने विचारमंथन घडवून आणले आणि त्याचेच प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात उमटले, अशा शब्दांत विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा गौरव केला.

आपल्या अभिजात प्रतिभेच्या माध्यमातून मराठी माणसाला कथा, कादंबरी, कविता, पोवाडे यांच्या माध्यमातून समृद्ध करणारे, स्वातंत्र्यलढ्याबरोबरच संयुक्त महाराष्ट्र, गोवामुक्तीच्या लढ्यात आपल्या शाहिरीने सत्ताधाऱ्यांत जरब आणि जनतेत जागृती निर्माण करणाऱ्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात शाहिरी जागरातून अभिवादन केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. मेघा पानसरे, डॉ. अक्षय सरवदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शाहीर आझाद नायकवडी, देवानंद माळी आदी.

अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून शाहिरी जागर, व्याख्यानाचे केले होते. वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये झालेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. अक्षय सरवदे होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी अण्णाभाऊंच्या जन्मशताब्दीनिमित्त विद्यापीठातर्फे विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

### शाहिरांनी भारावून टाकले

विद्यापीठातला शुक्रवारचा दिवस हा खऱ्या अर्थाने शाहिरांनी गाजविला. शाहीर देवानंद माळी (सांगली), शाहीर डॉ. आझाद नायकवडी (कोल्हापूर), शाहीर बाबुराव कांबळे (कांडगाव), शाहीर संजय जाधव (इचलकरंजी), शाहीर सदाशिव निकम (सिद्धनेर्ली) आणि शाहीर नुपूर व राजवैष्णवी वायदंडे यांनी 'शाहिरी जागर" या कार्यक्रमांतर्गत एकाहून एक सरस असे पोवाडे सादर करून वातावरण भारावून टाकले.

डॉ. आझाद नायकवडी यांनी शाहिरी मुजऱ्याने सुरुवात करून अण्णाभाऊंची 'जग बदल घालुनी घाव' आणि शाहीर आत्माराम पाटील यांची 'एका धरतीच्या पोटी' हे पोवाडे सादर करून कार्यक्रमाची दमदार सुरुवात केली. शाहीर देवानंद माळी यांनीही जोशात 'गण' आणि अण्णाभाऊंना स्वरचित शाहिरी वंदना अर्पण केली.

# ‘जग बदल घालून घाव, सांगून गेले मज भीमराव’

## अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शाहिरी जागर कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

‘जग बदल घालूनी घाव, मज सांगून गेले भीमराव’, ‘माझी मैना गावाकडं राहिली, माझ्या जीवाची होती या काहिली’ असे एकाहून एक सरस असे पोवाडे सादर शाहिरांनी शुक्रवारचा दिवस गाजविला. बाहेर मुसळधार पाऊस असतानाही विद्यापीठातील वातावरण भारावून गेले होते.

शिवाजी विद्यापीठ अण्णा भाऊ साठे अध्यासनातर्फे अण्णा भाऊंच्या जन्मशताब्दी वर्षाच्या प्रारंभानिमित्ताने ‘शाहिरी जागर’ विशेष शाहिरी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये झालेल्या कार्यक्रमाचे उद्घाटन विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांच्या हस्ते झाले. इंग्रजी अधिविभागाचे प्रमुख डॉ. अक्षय सरवदे अध्यक्षस्थानी होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. साहित्याच्या सार्वकालिक निकषांवर लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य चिरंतन टिकून राहणारे आहे, असे प्रतिपादन डॉ. पानसरे यांनी केले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अण्णा भाऊ साठे अध्यासनातर्फे आयोजित ‘शाहिरी जागर’ कार्यक्रमात सादरीकरण करताना शाहीर देवानंद माळी व सहकारी. (छाया : पप्पू आत्तार)**

डॉ. आझाद नायकवडी यांनी अण्णा भाऊंची ‘जग बदल घालूनी घाव, सांगून गेले मला भीमराव’ या शाहिरी गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. शाहीर आत्माराम पाटील यांनी ‘एका धरतीच्या पोटी’ हा पोवाडा सादर केला. शाहीर देवानंद माळी यांनी ‘गण’ व अण्णा भाऊंना स्वरचित शाहिरी वंदना अर्पण केली. त्यानंतर दिवसभरात शाहीर बाबुराव कांबळे, शाहीर संजय जाधव, शाहीर नुपूर व राजवैष्णवी वायदंडे या भगिनी व शाहीर सदाशिव निकम यांनी जोशपूर्ण सादरीकरण केले. त्यामुळे कार्यक्रमाची उत्तरोत्तर रंगत चढत गेली. अध्यासनाचे प्रमुख, मराठी विभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. यावेळी शाहीर राजू राऊत, शामराव खडके, विनायक चव्हाण, दिलाप सावंत आदी उपस्थित होते.


लोकमत

# ‘या देशाला जिजाऊंचा शिवा पाहिजे...’

## विद्यापीठात अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ‘जग बदल घालुनी घाव,’ ‘एका धरतीच्या पोटी,’ ‘या देशाला जिजाऊंचा शिवा पाहिजे’, आदी पोवाड्यांतून ‘शाहिरी जागर’ कार्यक्रमाद्वारे शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन केले.



अण्णा भाऊ साठे अध्यासनाच्या वतीने वि. स. खांडेकर भाषाभवनमध्ये ‘शाहिरी जागर’ कार्यक्रम आयोजित केला होता. डॉ. मेघा पानसरे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी डॉ. अक्षय सरवदे, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते. शाहीर देवानंद माळी, आझाद नायकवडी, बाबूराव कांबळे, संजय जाधव, सदाशिब निकम आणि नूपुर व राजवैष्णवी बायदंडे यांनी एकाहून एक सरस पोवाडे सादर करून वातावरण भारावून टाकले. शाहीर राजू राऊत, शामराव खडके, विनायक चव्हाण, दिलीप सावंत आदी उपस्थित होते.

### चिरंतन टिकणारे साहित्य

साहित्याच्या सार्वकालिक निकषांवर लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य चिरंतन टिकून राहणारे आहे. यातील विचारांनी महाराष्ट्राच्या वैशिष्ट्यांना जिवंत केले. त्यांनी प्रबोधनात्मक साहित्याची परंपरा निर्माण केली, असे डॉ. मेघा पानसरे म्हणाल्या.

डॉ. नायकवडी यांनी शाहिरी मुजऱ्याने सुरवात करुन ‘जग बदल घालुनी घाव’, ‘एका धरतीच्या पोटी’ हे पोवाडे केले. देवानंद माळी यांनी ‘गण’ आणि अण्णा भाऊंना स्वरचित शाहिरी वंदना अर्पण केली. संजय जाधव यांनी ‘या देशाला जिजाऊंचा शिवा पाहिजे’, ‘शिवारी चला’ सादर केले. सदाशिव निकम यांनी ‘भीमसूर्याचा जाळ अण्णा भाऊ,’ सादर केले. बाबूराव कांबळे, नूपुर व राजवैष्णवी बायदंडे यांनी जोशपूर्ण सादरीकरण केले. अध्यासनाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

लोकमत

# विद्यार्थी परिषद राखीव प्रवर्ग सोडत बेकायदेशीर : मगदूम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ नुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त व भटक्या जाती, इतर मागास जाती या चार राखीव प्रवर्गासाठी महाविद्यालय आणि विद्यापीठ अधिविभागांना सोडतीद्वारे प्रतिनिधी ठरवून देण्याचे आहे; परंतु, विद्यापीठ प्रशासनाने या चार राखीव प्रवर्गांमधील पोट जातींनाही प्रतिनिधीत्व देऊन गंभीर चूक केली आहे. त्याचा थेट परिणाम विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या मतदारसंख्येवर होणार आहे. कायद्यातील तरतुदीत बदल करण्याचा अधिकार कुलगुरुंना नाही; त्यामुळे ही सोडत बेकायदेशीर आहे, असा आरोप शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे संस्थापक अध्यक्ष बसंतराव मगदूम यांनी शुक्रवारी पत्रकाद्वारे केला आहे.

ते म्हणतात, विद्यार्थी परिषद राखीव प्रवर्ग ठरविताना कोणत्या नियमाने ठरविली, हे प्रशासन सांगू शकत नाही; त्यासाठी राखीव प्रवर्गासाठी असलेल्या रोस्टर पद्धतीचा नियम वापरला असल्याची शक्यता आहे. त्यातून खुला प्रवर्ग गायब करुन वापरल्याची शक्यता वाटते. राखीव प्रवर्ग ठरविताना हा नियम वापरता येत नाही. या नियमामध्ये पोट-जातींच्या प्रवर्गास प्रतिनिधीत्व देऊन विद्यापीठ प्रशासनाने चूक केली आहे.

## असा राखीव प्रवर्ग ठरविता येईल

अनुसूचित जाती (७४), अनुसूचित जमाती (७४), भटक्या व विमुक्त जाती (७३), इतर मागास वर्गाचे जाती (७३) अशा पद्धतीने २९४ महाविद्यालयांना राखीव प्रवर्ग ठरविता येईल, असे मगदूम यांनी सुचविले आहे.